# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २५/०५/२०२१ (मंगळवार )

## अमंली पदार्थ (गांजा) व वाहतुक करणाऱ्यासाठी उपयोगात आणलेली मोटार सायकलसह एकुण १,१९,७००/— चा मुद्येमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे आदेशाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात दिनांक २४/०५/२०२१ रोजी रात्री दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथक नागपूर उपविभाग नागपूर ग्रामीण परिसरात पेट्रोंलीग करीत असतांना पथकास गोपनिय माहिती मिळाली की, एक इसम एका मोपेड वाहनाने नागपूर येथून अंमली पदार्थ (गांजा) वर्धा येथे घेवून जाणार आहेत. मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे वेदार्या होम्स कॉलोनी येथे थांबवून नागपूर कडून वर्धाला जाणाऱ्या वाहनाची पाहणी करित असतांना नमुद वर्णानाची मोपेड ही येतांना दिसली असता त्यांचे वाहन चालकास थांबविण्याचे ईशारा दिला असता वाहन चालक आपले वाहन मोक्यावर सोडून आंधाराच फायदा घेवून फरार झाला. मोपेड हिरो मायस्ट्रो एम.एच.४९ एम.वाय.१९३३ ची पाहणी केली असता वाहनाचे डिक्कीत ४ किलो ९७० ग्राम ओलसर अंमली पदार्थ (गांजा) असल्याचे आढळुन आले. अंमली पदार्थ (गांजा) ४ किलो ९७० ग्राम कि. रुपये ४९,७००/—, मोपेड हिरो मायस्ट्रो एम.एच.४९ एम.वाय. १९३३ कि. ७०,०००/— एकुण १,१९,७००/— चा मुद्येमाल जप्त करुन मोपेड हिरो मायस्ट्रो एम.एच.४९ एम.वाय.१९३३ चे चालकाविरुध्द पोलीस स्टेशन बोरी येथे अप क्रमांक २२२/२०२१ कलम २०,२२ एन. डी.पी.एस. कायदा अन्वये गुन्हा नोंद असून जप्त मुद्येमाल पोलीस स्टेशन बोरी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, जावेद शेख, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, महेश जाधव, पोना रामा आडे, सत्यशिल कोठारे पोलीस शिपाई रोहन डाखोरे, अमृत किनगे, बालाजी साखरे चासफौ साहेबराव बहाळे यांनी पार पाडली.

# प्रतिबंधीत बियाणे विक्री करुन शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्यावर कार्यवाही

पो.स्टे.बेला :— दिनांक २४/०५/२०२० रोजी पोलीस स्टेशन बेला चे ठाणेदार हे आपल्या सहकारी कर्मचारी पोहवा अजय चौधरी व पोशि निलकंठ कटोरे सोबत पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलिंग करित असतांना त्या गोपनिय माहिती मिळाली की ३ दुकाची वाहनावर ६ ईसम हे महाराष्ट्रात प्रतिबंधीत एच.टि.बि.टि. कापुस बियाणे विक्री करण्याकरिता वाहतुक करित आहेत या मिळालेल्या माहिती वरुन बेला सिर्सी रोड वरील पेट्रोल पंप चे पुढे नाकांबदी करित असतांना १) हिरो होडा पॅशन प्रो क्र एम.एच ३१ डीडी ६३९६, २) एक्टीवा दुचाकी क्र एम.एच ४० बी वाय ३७७६, ३) दुचाकी क्र एम.एच ३१ बी सी १९९४ वर ६ इसमा डबलसिट येतांना दिसले त्यांना थांबवुन त्याचे नाव—गांव विचारले असता १) अभिषेक उर्फ सोनु नंदुजी पुरी वय २१ वर्ष रा. वार्ड क्र ०३ बेला तह.उमरेड जि. नागपुर, २) कार्तीक गंगाधर तिमांडे वय २१ वर्ष रा. वार्ड क्र ०१ बेला तह.उमरेड जि. नागपुर ३)अंकित ज्ञानेश्वर ढेकण वय २३ वर्ष रा. वार्ड क्र ०२ बेला तह.उमरेड जि.नागपुर ४) प्रथमेश ज्ञानेश्वर उकुंडे वय २२ वर्ष रा. वार्ड क्र ०२ बेला तह.उमरेड जि. नागपुर, ५) साहिल जयंत लांडे वय १९ वर्ष रा. वार्ड क्र ०२ बेला तह.उमरेड जि. नागपुर ६)दिलीप शेषरावजी हिवरकर वय ५३ वर्ष रा. पिपरा उमरेड जि. नागपुर असे सांगीतले त्याचे सोबत असलेल्या पिशवी ची पाहणी केली असता १) प्लास्टीक पॅकेट ज्यावर राशी ६५९ बी जी ४ असे लिहलेले त्यामध्ये महाराष्ट्र प्रतिबंधित एच टि बि टी कापसाचे बियाणे प्रत्येकी पॅकेट वजन ४५० ग्राम किमंती अंदाजे १००० रुपये असे एकुण २५ पॅकेट व एकुण किमंती २५००० रुपये २) प्लास्टीक पॅकेट ज्यावर सिकन्दर हायब्रिड नरमा बिज असे लिहलेले त्यामध्ये महाराष्ट्र प्रतिबंधित एच टि बि टी कापसाचे बियाणे प्रत्येकी पॅकेट वजन ४५० ग्राम किमंती अंदाजे १००० रुपये असे एकुण ४३ पॅकेट व एकुण किमंती ४३००० रुपये ३) प्लास्टीक पॅकेट ज्यावर आर कोट ७०२३४३ असे लिहलेले त्यामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित एच टि बि टी कापसाचे बियाणे प्रत्येकी पॅकेट वजन ४५० ग्राम किमंती अंदाजे १००० रुपये असे एकुण २९ पॅकेट व एकुण किमंती ३०००० रु मिळुन अल्याने सदर मुद्येमाल एकुण ९८ पॅकेट प्रतिंबधीत बियाणे, ३ मोटार सायकल व ३ मोबाईल असा एकुण २,७०,०००/— चा माल जप्त करुन आरोपी विरुध्द कृषी अधिकारी श्री. नागरगोजे यांचे फिर्यादि वरुन नमुद आरोपी विरुध्द पोलीस्टेशन बेला येथे कलम ४२०,३४ भादवि सहकलम ७ बियाणे कायदा १९६६ सहकलम ३ बियाणे नियंत्रण आदेश १९८३ बियाणे नियम १९६८ चे नियम ७,८,९,१०,११,१२,१३ ,१४ महाराष्ट्र कापुस बियाणे निनीमय अधि नियम २०१० चा नियम १० पर्यावरण सरंखण कायदा १९८६ चे कलम ७,१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढिल तपास सपोनी पंकज वाघोडे ठाणेदार, बेला पोलीस स्टेशन हे करित आहेत

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, उप विभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग श्री.राजेन्द्र चव्हाण यांचे मार्गदर्शनात सपोनि पंकज वाघोडे, पोउपनि राहुल ठेंगणे, पोहवा अजय चौधरी, नापोशि कुणाल ठाकुर, पोशि प्रमोद ढुमणे, पोशि वंसता नागरे, पोशि पदमाकर विधाते, पोशि निलकंठ कटोरे, चालक पोहवा मनोज मेंडुले यांनी पार पाडली.

## —: मद्यधुंद होवून कार चालवून २ लोकांचा जिव घेणाऱ्यास अटक —

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत २ कि.मी. दहेगांव रंगारी येथील महाराजा लॉन समोर समोर दिनांक २४. ०५.२०२१ चे ०१.१५ ते ०१.३० वा. दर. संकेत अशोक ढोक वय २४ वर्षे रा. प्लॉट क्र. १०१, झिंगाबाई टाकळी नागपुर हा जास्त प्रमाणात मद्यपान करुन आपली पांढऱ्या रंगाची आय २० कार क्र. एमएच—३१ डीसी ८८२७ स्वत: हयगयीने व निष्काळजीपणे ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र एमएच —४० एझेड १०५५ आणी केटीएम डयुक मोटार सायकल क्र एमएच—४० बीव्ही ०४०९ ला मागुन जबरदस्त धडक मारून, ॲक्टीव्हा ला आपल्या कार सोबत घासत रोड चे डावे बाजुला घेवुन गेला या अपघातात ॲक्टीव्हा स्वार **१) सुरेश उपेंद्र चौधरी वय २४ रा. जयभोलेनगर चनकापुर, २) हर्षल रविशंकर बनोदे वय २४ रा. चनकापुर हे जख्मी युवक ॲलेक्सीस हॉस्पीटल नागपुर येथे उपचारा दरम्यान मरण पावले.** केटीएम डयुक मोटार सायकल क्र एमएच—४० बीव्ही ०४०९ ला मागुन जबरदस्त धडकात **१) नितेश शालीकराम पंचेश्वर वय २४ रा. चनकापुर व डयुक मो.सा. स्वार १) प्रतिक राजेंद्र बनोदे वय २४ रा. चनकापुर, २) रिषभ मनोहर माठे वय २४ रा. खापरखेडा** हे गंभीररित्या जखमी झाले.

सदर प्रकरणी प्रत्यक्षदर्शी फिर्यादी नितेश मुरलीधर वर्मा वय २४ वर्षे रा. चनकापुर कॉलोनी चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी अशोक ढोक वय २४ वर्षे रा. प्लॉट क्र. १०१, झिंगाबाई टाकळी नागपुर विरुध्द पो.स्टे. खापरखेडा खापरखेडा येथे कलम २७९, ३३८, ३०४ (अ) **भा.दं.वि. सहकलम १८४, १८५ मोवाका.** अन्वये गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोउपनि मनोज मेश्राम पो.स्टे. खापरखेडा ९४२३१ १५२६० हे करीत आहे.

## —: दुध व बेकरी चे धंदयावरुन मारहाण व जिवे मारण्याची धमकी :—

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत कळमेश्वर शहरात सचिन अरविंद दामले वय ३९ वर्ष, रा. नागपुर हा आपल्या स्वत:च्या मालकीच्या वाहने कंपनीकडुन दुध व ब्रेंडचा माल ट्रान्सपोर्ट करतो. २४/०५/२०२१ चे १०/३० वा दरम्यान हा साखरकर डेहरी तळयाचा पायरी जवळ कळमेश्वर येथे दुधाचे खाली कॅरेट आपले गाडीत ठेवत असता १) सतिश सुरेश वाकडे वय २७ वर्षे रा. ब्राम्हणी कळमेश्वर, २) धिरज धर्माजी हिवराडे वय २५ वर्ष रा. धुरखेडा बोरगाव ह.मु. घोराड यांचे सोबत आखणी एक इसम एकत्र जवळ येवुन तु आमचा कळमेश्वर मध्ये माल ट्रान्सपोर्ट कशाला करतो यामुळे आमचे ुकसान होते. यावरुन तेव्हा सचिन अरविंद दामले म्हटले कि, कंपनीचा माल आणतो माझा घरचा नाही. आणत यावरून आरोपीतांनी संगणमत करून सचिन अरविंद दामल ला हातबुक्कयांनी मारहाण केले व डाव्या हाताच्या मधला बोटांला आरोपी सतिश सुरेश वाकडे वय २७ वर्षे रा. ब्राम्हणी कळमेश्वर, याने चावले तसेच या दरम्यान सचिन अरविंद दामल चा मुलगा मध्यस्थी करण्यास आला असता त्याला सुद्या वरील तिन्ही आरोपीतांनी खाली पाडून हातभुक्कीने मारहाण करुन शिवीगाळ करून पुन्हा पाहुन घेण्याची धमकि दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी सचिन अरविंद दामले वय ३९ वर्ष, रा. नागपुर चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी १) सतिश सुरेश वाकडे वय २७ वर्षे रा. ब्राम्हणी कळमेश्वर, २) धिरज धर्माजी हिवराडे वय २५ वर्ष रा. धुरखेडा बोरगाव ह.मु. घोराड, यांचे सोबत आखणी एक इसम विरुध्द पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम

३२४,५०४,५०६,३४ भादवी भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ राजेद्र पाली पोस्टे कळमेश्वर मो क्र.९२८४३५४६३० हे करीत आहे.

**—: चोरी (मंदिराची) :—**

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत २ किमी अंतरावरील मायापुरी मंदिर, बायपास रोड रामटेक येथे दिनांक २३/०५/२०२१ चे रात्री दरम्यान अज्ञात इसमांने मंदीरातील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून मंदिरामध्ये ठेवलेली पॅलीकॅप कंपनीची पाण्याची मोटर व पाईप किमत ४४०५ रूपयाची चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी उदय दत्तात्रय भोगे वय ३८ वर्ष रा. भगंतसींग वार्ड रामटेक चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. रामटेक येथे कलम ४५७,३८० भादंवि भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा मनोहर राऊत मो. नं. ९४२३६२८३०७ हे करीत आहे.

**—: चोरी (प्राथमीक स्वास्थ केन्द्र) :—**

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ७ किमी अंतरावरील नगरधन येथील प्राथमिक स्वास्थ केन्द्र येथे खुल्या रूम मध्ये ठेवलेली एक एक्साइड इनव्हेस्टर जंबो टॅबलर बॅटरी लाल रंगाची किंमत १३०० रू चे कोणीतरी अज्ञात इसमानी २१/०५/२०२१ चे १९:०० ते २२/०५/२०२१ चे सकाळी ७:३० वा. दरम्यान चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी डॉ.सौ स्मीता माधव काकडे रा. नगरधन चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. रामटेक येथे कलम ४५७,३८० भादंवि भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ सदाशिव काठे मो. नं. ९०११३२६७९३ हे करीत आहे.

**—: चोरी (शेती विषयक ) :—**

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १८ किमी अंतरावरील झिल्पा शिवारात सौ. उर्मिला संजीव वासनिक वय ६० वर्ष रा पंचवाटीका २१२२ चिटनविस लेआउट नागपूर यांचे शेत तलावात असून सदर तलावात टाकलेला मटेरियल कापड १०० X १०० फूटाचा त्यामधून प्लास्टीक कापड १५ फूट रुंदी व ३५ फूट लांबीचा किमती अंदाजे ५००० रु चा कापून दिनांक २२/०५/२०२१चे ०८/०० वा ते ०९/३० वा दर १.दिलीप उमाटे व सोबत एक इसम दोन्ही राहणारे रा गोंडी मोहगाव यांनी चोरुन घेवून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. उर्मिला संजीव वासनिक वय ६० वर्ष रा पंचवाटीका २१२२ चिटनविस लेआउट नागपूर चे तोंडी पो.स्टे.काटोल येथे कलम ३७९ भादंवि भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास मपोहवा पंचफुला मोरे मो नं.९०४९६०७११५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**